


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २४१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शनिवार, दि.१२ एप्रिल २०२५




## वक्फ सुधारणा कायद्यावर 'आरएसएस' मैदानात

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, नागपूर :** संसदेच्या दोन्ही सभागृहानं मान्यता दिल्यानंतर वक्फ संशोधन विधेयक लागू झालं आहे. या विधेयकावरील आक्षेपांना केंद्र सरकारकडून संसदेतील चर्चेत उत्तर देण्यात आले होते. त्यानंतरही विरोधकांचे समाधान झालेले नाही. देशातील अनेक भागात या संशोधन विधेयकाच्या विरोधात आंदोलन झालं. पश्चिम बंगालमध्ये हे आंदोलन हिंसक बनले होते. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी तर या विधेयकाची अंमलबजावणी राज्यात केली जाणार नाही, अशी घोषणा केली आहे. या विधेयकाला होत असलेल्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (ठडड) मैदानात उतरला आहे.




राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा असलेल्या मुस्लीम राष्ट्रीय मंचाकडून या विधेयकाबाबत जनजागृती अभियान राबवले जाणार आहे. मुस्लीम राष्ट्रीय मंचाचे अखिल भारतीय संयोजक विराग पाचपोर यांनी 'छूढत मराठी' बरोबर बोलताना ही माहिती दिली.

**काय आहे अभियान?**

या कायद्यामुळे मुस्लिम समाजाचे कुठलेही नुकसान होणार नसून त्यांच्या मशिदी, त्यांच्या इमारती, त्यांचे कब्रस्तान कुणी हिरावून घेणार नाही, हे स्पष्टपणे समाजात सर्वांना कळले पाहिजे. काही कट्टरपंथी लोक मुस्लिम समाजात गैरसमजुती पसरवून भावना भडकवण्याचा प्रयत्न करत आहेत. या अभियानाद्वारे वक्फ सुधारणा कायदा सामान्य मुस्लिमांच्या कशा हिताचा आहे हे तथ्यांच्या आधारे समजावून सांगितले जाईल.

देशात मोठ्या प्रमाणात वक्फ संपत्ती असून देखील त्याचा वापर आजवर कसा पद्धतीने करण्यात आला आणि त्यातून मुस्लिम समाजातील सामान्य सदस्यांना काही लाभ कसा मिळाला नाही, हे प्रश्न आता विचारले जात आहेत. त्या पार्श्वभूमीवर हे अभियान महत्त्वाचे ठरणार असल्याचे पाचपोर यांनी स्पष्ट केले.

देशभरातील प्रत्येक शहरात आणि जिथे जिथे मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणात आहे तिथे सर्व ठिकाणी सभा आणि बैठका घेण्यात येणार आहेत. या विधेयकाला जिथं हिंसक विरोध झाला त्या पश्चिम बंगालमध्येदेखील देशाच्या अन्य भागाप्रमाणेच हे अभियान राबविण्यात येणार आहे.

## मोबाईल चोरीच्या गुन्ह्यात आरोपी अटकेत २ गुन्हे उघडकीस....

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.११, डोंबिवली (ठाणे) :** मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिनांक २४ मार्च २०२५ रोजी रात्री ११.४५ वाजता डोंबिवली पूर्व येथील मिलापनगर भागात पोटोबा हॉटेलजवळ फिर्यादी श्री. ओमकार जगन्नाथ पवार हे पायी चालत असताना अज्ञात आरोपीने त्यांच्या हातातील सुमारे २०,०००/- रुपये किमतीचा ॲपल कंपनीचा मोबाईल हिसकावून चोरी करून नेला. या प्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ३१९/२०२५ अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३९२, ३४ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला.




गुन्हा घडल्यानंतर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाच्या विविध टीम तयार करून तपासाला सुरुवात करण्यात आली. तपासादरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे रेतीबंदर रोड, गोविंदवाडी, कल्याण येथील दारूल फल्लह मस्जिदजवळ सापळा रचण्यात आला. त्यावेळी एक इसम मोटारसायकलवर संशयास्पदरीत्या फिरताना आढळला. त्याला अडवून विचारपूस केली असता त्याने मोबाईल चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली.

सदर आरोपीचे नाव हंजला लियाकत खान (वय २५ वर्षे, रा. रूम नं. ७, निसार कुवारी चाळ, दारूल फल्लह मस्जिद जवळ, रेतीबंदर रोड, गोविंदवाडी, कल्याण पश्चिम) असे आहे. त्याच्याकडून २ मोबाईल फोन्स आणि एक मोटारसायकल असा एकूण ९६,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमूद आरोपीच्या साथीदाराचा शोध सुरु आहे.

या आरोपीकडून मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील २ मोबाईल स्नॅचिंगचे गुन्हे उघडकीस आले आहेत. तसेच यापूर्वीही आरोपीविरुद्ध मुंब्रा पोलीस ठाणे, बाजारपेठ पोलीस ठाणे, खडकपाडा पोलीस ठाणे आणि महात्मा फुले पोलीस ठाणे येथे एकूण ४ गुन्हे नोंदवले गेले आहेत.

ही यशस्वी कारवाई मान्यवर अपर पोलीस आयुक्त (पूर्व प्रादेशिक विभाग) संजय जाधव, पोलीस उप आयुक्त (परिमंडळ ३, कल्याण) अतुल झेंडे, आणि सहाय्यक पोलीस आयुक्त (डोंबिवली विभाग) सुहास हेमाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील अधिकाऱ्यांनी केली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने,पोलीस निरीक्षक (गुन्हे) रामचंद्र चोपडे,पोलीस निरीक्षक (गस्त व सुरक्षा) जयपालसिंह गिरासे, पोलीस निरीक्षक (प्रशासन) दत्तात्रय गुंड,सहाय्यक पोलीस निरीक्षक संपत फडोळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश राळेभात, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर चव्हाण तसेच, पोलीस हवालदार व कर्मचारी पुढील प्रमाणे राजकुमार खिलारे, सचिन साळवी, शिरीष पाटील, सुनिल पवार, संजू मासाळ, विकास माळी, सुशांत पाटील, यल्लापा पाटील, कृष्णा बोराडे, गणेश भोईर, अशोक आहेर, विजय आव्हाड, गणेश बडे, घनश्याम ठाकूर, नाना चव्हाण, सोपान शेळके, योगेश आडे यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली.

## साईंच्या पादुका दर्शन सोहळ्याला उच्च न्यायालयाकडून हिरवा कंदील

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, शिर्डी :** शिर्डीतील बहुचर्चित साई पादुका दर्शन सोहळ्याला उच्च न्यायालयाचा हिरवा कंदील मिळाल्यानंतर आजपासून साईबाबांच्या मूळ पादुका भारत भ्रमण करणार आहेत. आज सकाळी साईसंस्थानच्या वतीनं विधीवत पूजा करत साईंच्या मूळ चर्म पादुका दर्शन सोहळ्यासाठी रवाना झाल्या आहेत. पहिल्या टप्प्यात दक्षिण भारतातील आठ शहरांत हा दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यासाठी सुरक्षाची सर्व खबरदारी साई संस्थानच्या वतीनं घेण्यात आली आहे.

महाराष्ट्रासह कर्नाटक तामिळनाडू राज्यात साईसंस्थानच्या वतीनं साई पादुका दर्शन सोहळ्याच आयोजन करण्यात आल असून सकाळी साई मंदिरातून बाबांच्या चर्म पादुका बाहेर काढण्यात आल्या आहे. तसेच याचा सवाद्य मिरवणूक काढत संस्थाचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या हस्ते पुजन करण्यात आलं.

गेल्या अनेक दिवसांपासून दक्षिणेतील भाविकांची बाबांच्या मूळ पादुका दर्शन सोहळा आपल्या भागात आयोजित करावा. भाविकांची मागणी पाहता शिर्डी साईबाबा संस्थांच्या वतीने आज १० एप्रिलपासून २६ एप्रिलपर्यंत साईबाबांच्या मूळ चर्म पादुका महाराष्ट्रासह कर्नाटक, तामिळनाडू या राज्यातील आठ शहरात भाविकांना दर्शनासाठी असणार आहे.

**असा असेल साई चर्म पादुका दौरा सोहळा...**

- १० ते १३ एप्रिलपर्यंत महाराष्ट्रातील सांगली शहर व जिल्ह्यातील पेठ वडगाव येथे भाविकांना दर्शनासाठी साईंच्या मूळ चरण पादुका उपलब्ध असणार आहेत.

- १४ ते १८ एप्रिलपर्यंत कर्नाटक राज्यातील, दावनगेरे, मल्लेश्वरम येथे सहा दिवस साईबाबांच्या पादुका भाविकांना दर्शनासाठी असणार आहे. यानंतर १९ एप्रिल रोजी सायंकाळी तामिळनाडूकडे पादुका रवाना होणार आहे.

- १९ ते २६ एप्रिलपर्यंत तामिळनाडू राज्यातील सेलम, करूर, पुलीयमपट्टी, धर्मापुरी येथे साईंच्या पादुका भाविकांना दर्शनासाठी उपलब्ध असणार असून धर्मपुरी येथून २६ एप्रिल रोजी संध्याकाळी साईंच्या पादुका पुन्हा शिर्डीकडे रवाना होणार आहे.

असा तब्बल २७७६ किलोमीटरचा साईंच्या मूळ चर्म पादुकांचा दौरा असणार अशी माहिती साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी सांगितलं.

## लग्नासाठी दबाव, संपूर्ण कुटुंबाला संपवण्याची धमकी...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, बारामती :** बारामती तालुक्यात १६ वर्षीय मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या विद्यार्थिनीने ८ एप्रिल २०२५ रोजी राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. तिला काही दिवसांपासून विशाल गावडे आणि त्याचे मित्र प्रविण गावडे, शुभम गावडे व सुनील खोमणे यांच्याकडून मानसिक त्रास दिला जात असल्याची माहिती तिच्या कुटुंबियांनी दिली आहे.

मुलीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीनुसार, विशाल गावडे तिचा पाठलाग करत होता. तिच्यावर लग्नासाठी दबाव टाकत होता आणि नकार दिल्यास संपूर्ण कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी देत होता. या त्रासाला कंटाळून मुलीने आत्महत्येचा निर्णय घेतल्याचे कुटुंबियांचे म्हणणे आहे. बारामती तालुक्यातील वडगाव निंबाळकर पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.


दिलेल्या तक्रारीनुसार,सप्टेंबर २०२४ पासून यातील विशाल दत्तात्रय गावडे आणि त्याचे मित्र प्रविण गावडे, शुभम गावडे व सुनील खोमणे हे संबंधित मुलीला मानसिक त्रास देत होते. 'तू जर विशाल गावडेला नाही बोलली आणि त्याचे बरोबर लग्न नाही केले, तर तुझे घरातील कुणालाही जिवंत ठेवणार नाही. त्या सर्वांची कोयत्याने मुडंकी उडवीन, अशी धमकी दिली जात होती, असं मुलीच्या वडिलांनी तक्रारीत म्हटले आहे.

## थोडक्यात

### मुंबईतील टँकरचालकांच्या संपावर तोडगा काढण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या सुचना

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, मुंबई :** मुंबईतील टँकरचालकांचा संप सुरु असल्याने काही भागात पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. उन्हाळ्याचा काळ पाहता ही स्थिती अशीच राहणे योग्य नाही. त्यामुळे बदललेले नियम आणि टँकरचालकांच्या मागण्या यातून सुवर्णमध्य साधत, सामान्य जनतेला त्रास होणार नाही, यादृष्टीने तातडीने तोडगा काढावा, असे निर्देश मी मुंबई महापालिका आयुक्तांना दिले आहेत. असं ट्वीट देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.



### बुलढाण्यात उष्माघाताचा पहिला बळी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, बुलडाणा :** बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव येथील बारा वर्षीय संस्कार सोनटक्के या विद्यार्थ्यांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचं समोर आल्यानंतर बुलढाणा जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांनी नागरिकांना काळजी घेण्याचा आवाहन केला आहे. शक्यतो उन्हाच्या वेळेस घराच्या बाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी प्यावं, तसंच उष्माघाताची लक्षणे व आढळल्यास तात्काळ शासकीय रुग्णालयात वैद्यकीय मदत घ्यावी असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक यांनी जनतेला केला आहे.

### 'शिवी मुक्त शाळा' अभियान...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, बदलापूर :** हल्ली शाळेत विद्यार्थ्यांच्या तोंडून सर्रासपणे शिव्या ऐकायला मिळतात. पण त्यांच्या तोंडातली ही शिवराळ भाषा काढून टाकण्याचे प्रयत्न शाळा आणि पालक करतात. त्यात काहींना यश येतं तर काहींना यश येत नाही. अशा वेळी आता 'शिवी मुक्त शाळा' हे अनोखं अभियान राबवलं जाणार आहे. हे अभियान बदलापुरातल्या सर्व शाळांमध्ये राबवली जाईल. आमदार किसन कथोरे यांच्या संकल्पनेतून आगामी शैक्षणिक वर्षात सर्व शाळांमध्ये ही मोहीम राबवली जाणार आहे.

बदलापूरच्या आदर्श शाळेत मुख्याध्यापक आणि शिक्षकांच्या कार्यशाळेतून या अभियानाला सुरुवात झाली. अलीकडच्या काळात टीव्ही आणि मोबाईलचा वाढता प्रभाव, मुलांकडे पालकांचं होत असलेलं दुर्लक्ष यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिव्या देण्याचं प्रमाण वाढलं आहे. मुलं असभ्य वर्तन करू लागली आहेत. हे चित्र बदलण्यासाठी बदलापुरातल्या सर्व शाळांमध्ये शिवीमुक्त शाळा अभियान राबवला जाणार आहे.

यासाठी या सर्व शाळांमध्ये कडक नियमावली केली जाणार आहे. मुलांच्या वर्तनावर शिक्षकांचा वॉच असेल. मुलांनी शिवीगाळ केल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल. विशेष म्हणजे हा दंड पालकांना भरावा लागेल. या अभियानामुळे मुलांवर निश्चितच चांगले संस्कार होतील, त्यांच्या भाषेचा दर्जा सुधारेल, एक सुजाण पिढी तयार करण्यासाठी हे अभियान पथदर्शी ठरेल, असा विश्वास आमदार किसन कथोरे यांनी व्यक्त केलाय.

बदलापूरमध्ये झालेल्या काही अप्रिय घटनांमुळे हे शहर चर्चेत राहीले आहे. अशा वेळी ही सकारात्मक आणि तेवढीच चांगली बातमी या शहरातून येत आहे. हे अभियान जरी बदलापूर शहरा पूरता मर्यादीत असले तरी भविष्यात ते संपूर्ण राज्यातही राबवले जाण्याची दाट शक्यता आहे. यातून मुलांनाही शिस्त लागेल. त्यांच्या बोलण्या वागण्यात बदल होतील. शिवाय पालकांना दंड भरावा लागत असल्याने त्यांच्यात धाक ही निर्माण होईल.

# संपादकीय



## हनुमान !

भक्त कसा असावा तर तो महाबली हनुमंतासारखा असावा. हनुमंताची प्रभू श्रीरामांप्रती असलेल्या निस्सीम भक्तीची आजतागायत अनेक उदाहरणे आपण गोष्टींच्या रूपाने वाचली आणि ऐकली आहेत. प्रचंड सामर्थ्य असतानाही आपल्या आराध्याप्रती कसा भक्तिभाव असावा हे हनुमंताच्या जीवनचरित्रावरून लक्षात येते. सप्त चिरंजीवांपैकी एका असलेल्या भक्तशिरोमणी हनुमंताची जयंती यंदा शनिवारी आल्याने तिला विशेष महत्व असणार आहे. अशा भक्तवत्सल, महाबली हनुमंताची प्रभू श्रीरामांप्रती असलेल्या भक्तीचे एक उदाहरण आज आपण पाहणार आहोत

'एकदा हनुमानाची निस्सीम भक्ती पाहून प्रभु श्रीरामाने हनुमानाला वर मागण्यास सांगितले. 'जो कुणी प्रभु श्रीरामाचे स्मरण करत असेल, त्याचे संरक्षण हनुमंत करील आणि कुणीही त्या व्यक्तीचे अहित करू शकणार नाही', असा वर हनुमानाने मागितला. प्रभु श्रीरामाने 'तथाऽस्तु' म्हटले. त्रेतायुगात प्रभु श्रीराम अयोध्येचे राज्य करत असतांना काशीनरेश सौभद्रच्या मनात रामभेटीची मनीषा जागृत झाली. त्याच वेळी महर्षि विश्वामित्र यांच्याही मनात प्रभु श्रीरामाला भेटण्याची इच्छा निर्माण झाली. दोघेही अयोध्येच्या दिशेने निघाले. वाटेत एका शिव मंदिरात दोघांची भेट झाली. विश्वामित्रांचे शिष्य शिवाच्या मंदिरात विश्वामित्रांचा जयजयकार करत होते. 'शिवाच्या मंदिरात केवळ शिवाचाच जयघोष झाला पाहिजे, अन्य कुणाचाही जयजयकार केला, तर शिवाचा अपमान होतो', असे सौभद्र राजाला वाटले आणि त्याने विश्वामित्रांच्या जयजयकाराला विरोध केला. त्यामुळे महर्षि विश्वामित्र त्याच्यावर कोपले आणि त्यांच्यात वाद झाला. दोघेही जेव्हा अयोध्येत पोचले, तेव्हा त्यांना एकाच वेळी प्रभु श्रीरामाचे दर्शन झाले. महर्षि विश्वामित्रांनी प्रभु श्रीरामाला काशीनरेशाला कठोर शिक्षा करण्याची आज्ञा केली. प्रभु श्रीरामाने दुसर्या दिवशी न्यायसभेत वरील प्रसंगाचा न्यायनिवाडा करणार असल्याचे घोषित केले. 'प्रभु श्रीराम महर्षि विश्वामित्रांच्या सांगण्यावरून आपल्याला कठोर दंडित करतील', या विचाराने सौभद्र भयग्रस्त झाला. इतक्यात तेथे नारदमुनी प्रगट झाले आणि त्यांनी सौभद्राला हनुमंताची माता अंजनीदेवीला शरण जाण्यास सांगितले. नारदमुनींच्या सांगण्यावरून सौभद्र सुमेरूला गेला आणि त्याने अंजनीमातेचे चरण धरले. अंजनीमातेने त्याची स्थिती जाणून घेतल्यावर त्याचे रक्षण करण्याचे अभय वचन दिले. तिने हनुमंताला काशीनरेशाचे रक्षण करण्याचे दायित्व सोपवले. हनुमानाने ते स्वीकारले आणि तो दुसर्या दिवशी सौभद्राला सोबत घेऊन पवन वेगाने अयोध्येला येऊन पोचला. त्याने सौभद्रराजाला निर्भय होऊन शरयू नदीच्या किनारी अखंड रामनामाचे स्मरण करत रहाण्यास सांगितले. सौभद्रराजाने अचानक पलायन केल्याची वार्ता दुसर्या दिवशी महर्षि विश्वामित्रांना समजल्यावर ते अधिकच कोपित झाले. त्यांनी श्रीरामाला सौभद्राचा वध करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे प्रभु श्रीरामाने सूर्यास्त होण्यापूर्वी सौभद्राचा वध करण्याचा पण केला. प्रभु श्रीरामाचे सैनिक सौभद्राला सर्वत्र शोधत होते. त्यांनी तो शरयू नदीच्या किनारी हनुमंतासह रामनामात मग्न असल्याची सूचना महर्षि विश्वामित्र आणि श्रीराम यांना दिली. महर्षि विश्वामित्रांसह प्रभु श्रीराम धनुष्य बाण घेऊन शरयू किनारी आले. त्याने पाहिले की, हनुमान पुढे बसलेला आहे आणि त्याच्या मागे सौभद्र राजा बसलेला आहे. दोघेही रामनामाचा अखंड जप करत आहेत. प्रभु श्रीरामाने हनुमानाला बाजूला होण्यास सांगितले, तेव्हा हनुमानाने श्रीरामाला त्यांनी पूर्वी दिलेल्या वचनाची आठवण करून दिली. महर्षि विश्वामित्रांनी सौभद्रावर बाण चालवण्याचा आग्रह केला. प्रभु श्रीरामाला कळेना, 'हनुमानाला दिलेले वरदान खरे करावे कि विश्वामित्रांच्या सांगण्यावरून केलेला पण पूर्ण करावा ?' अखेर गुरुस्थानी असणार्या महर्षि विश्वामित्रांच्या आज्ञेवरून प्रभु श्रीरामाने सौभद्रावर बाण सोडला. हनुमनाच्या कृपेमुळे सौभद्राभोवती रामनामाचे संरक्षण निर्माण झाले होते. त्यामुळे प्रभु श्रीरामाचा बाण सौभद्राला लागला नाही. प्रभु श्रीरामाने अनेक बाण सोडले; परंतु एकही बाण सौभद्राला लागला नाही. 'रामबाण विफल होत आहेत', हा चमत्कार पाहून महर्षि विश्वामित्र थक्क झाले. त्यांनी अंतर्मुख होऊन विचार केला आणि त्यांच्या लक्षात आले की, भगवंताला स्वत:च्या वचनापेक्षा भक्ताला दिलेले वरदान पूर्ण होणे अधिक महत्त्वाचे वाटते. त्यामुळे त्यांनी श्रीरामाला पण मागे घेण्यास सांगितले. हनुमानाने काशीनरेश सौभद्राला महर्षि विश्वामित्रांचे चरण धरून क्षमा मागण्यास सांगितले. त्याप्रमाणे सौभद्रने महर्षि विश्वामित्रांची क्षमा मागितली आणि महर्षि विश्वामित्रांनी त्याला क्षमा केले. अशा प्रकारे हनुमानाने प्रभु श्रीरामाला धर्मसंकटातून सोडवले आणि सौभद्र राजाचे रक्षणही केले. वरदान आणि पण यांच्या युद्धात वरदानाचा विजय झाला. जर एखादा रामनामाचा जप करत असेल आणि साक्षात् प्रभु श्रीरामाने त्यावर बाण चालवला, तरी त्याचे काहीही अहित होत नाही, हे या प्रसंगातून दिसून येते. भक्तशिरोमणी हनुमानाने 'रामसे बडा रामका नाम' ही म्हण सार्थ ठरवली.'

# ॥ संकटमोचन हनुमान ॥



**- दिलीप देशपांडे**
**जामनेर, ८९९९५६६९१७**

हनुमान जयंती म्हणजे हिंदू देवता हनुमान यांचा जन्मदिवस होय. चैत्र महिन्यातील पौर्णिमा तिथीच्या दिवशी सूर्योदयाच्या वेळी हनुमान जयंती,जन्मोत्सव साजरा केला जातो. या दिवशी हनुमानाच्या देवळात सूर्योदयाच्या आधीपासून किर्तनाला प्रारंभ करतात. सूर्योदयाला हनुमनाचा जन्म होतो अशी कथा आहे, त्यानुसार किर्तन संपते आणि सर्वांना प्रसाद वाटला जातो.

महाराष्ट्रात शनिवार, तर इतर भारतात शनिवार आणि मंगळवार हे मारुतीचे वार मानले जातात. या दिवशी मारुतीला शेंदूर, तेल तसेच रुईची फुले आणि पाने अर्पण करण्याची प्रथा आहे. मारुतीला नारळ फोडण्याची रुढीही पूर्वापार चालत आलेली आहे.

: हनुमान हा सप्त चिरंजीवांपैकी एक चिरंजीव आहे, म्हणजे तो अजूनही जिवंत आहे, अशी मान्यता आहे. जगात ज्या ज्या ठिकाणी, जेव्हा जेव्हा रामाचे नाव घेतले जाते, तेथे मारुती हजर असतो, असे म्हणतात. या माहितीच्या आधाराने कवी तुलसीदासाने मारुतीला शोधून काढले.

मारुतीचा उल्लेख महाभारतातदेखील येतो. तो महाभारताच्या युद्धात दरम्यान अर्जुनाच्या रथाच्या ध्वजावर विराजमान होता.

झोपलेल्या मारूतीच्या मूर्ती काही ठिकाणी आहेत.

भारतात अशा आठ मूर्ती आहेत : १. भद्रा मारुती (खुलताबाद येथील घृष्णेश्वराच्या जवळ). २, अलाहाबादेत यमुनेच्या तीरावर (संगम घाटावर) ३, मध्य प्रदेशात जाम सावली येथे ४. राजस्थानमध्ये अलवर येथे ५. राजकोट ६. इटावा जिल्ह्यात पिलुआ गावात ७. चांदोली जिल्ह्यात आणि ८. छिंदवाडा येथे. तसेच बुलढाणा जिल्ह्यात खामगाव जवळ नांदुरा येथे ११० फूट उंच हनुमंताची आकर्षक मूर्ती आहे.

मारुती स्तोत्र हे मारुती तथा हनुमान या हिंदू देवतेची स्तुती करणारे काव्य होय.

या स्तोत्राची अनेक रुपे आहेत. त्यांपैकी समर्थ रामदासांनी लिहिलेले स्तोत्र महाराष्ट्रात प्रचलित आहे. याची सुरुवात भीमरूपी महारुद्र वज्र हनुमान मारुती... या पंक्तीने होते.

: हनुमान चालीसा हे हिंदी भाषिक राज्यात लोकप्रिय असलेले, हनुमानाचे एक स्तोत्र आहे. या स्तोत्रात ४० कडवी आहेत

श्री गोस्वामी तुलसीदास यांनी श्री हनुमान चालीसाची रचना १६ व्या शतकात केली.

हे स्तोत्र दोहा आणि चौपाई स्वरूपातील ४० श्लोकांचे आहे, म्हणून तिला चालीसा असे म्हणतात.

समर्थ रामदास स्वामी यांनी महाराष्ट्रातील चाफळ आणि जवळच्या परिसरात सातारा, कराड, कोल्हापूर मध्ये ११ ठिकाणी मारुतीच्या मूर्त्यांना स्थापित केले. आपण या ठिकाणांची माहिती करून घेऊया

**१) चाफळचा वीर मारुती / प्रताप मारुती /भीममारुती**

सातारा कराड चिपळूणकडून जाणाऱ्या फाट्याजवळ उंब्रज गावाजवळ चाफळ येथे रामाच्या देऊळासामोरी हात जोडून उभा दास मारुती आणि त्याच देऊळाच्या मागे प्रताप मारुतीची कृष्ण नदीच्या काठावर चुना, वाळू, ताग पासून बनवलेलीही मूर्ती स्थापिली आहे. ६ फुटी ही उंच मूर्ती रामाच्या समोर हात जोडून उभारल्या या मूर्तीचे नैत्र श्रीरामाच्या चरणाकडे स्थिर असल्याचे जाणवते. चाफळच्या रामाच्या देऊळाच्या मागे रामदासांनी बांधलेले हे देऊळ आजतायगत आहे. या देऊळातली मारुतीची मूर्ती भीमरूपी स्तोत्रामध्ये वर्णन केल्या सारखीच आहे. कमरेला सोन्याची कासोटी, किणकिणत घंटा, नेटका, सडपातळ डोळ्यातून अग्निवर्षाव होताना जाणवणे. मूर्तीच्या पायाखाली दैत्य आहे. चाफळ येथे मारुतीच्या दोन मुर्त्यांची स्थापना रामदासांनी केली असून दोन्ही मूर्तींचे रूप वेगवेगळे आहे.

**२) माजगावचा मारुती**




चाफळपासून ३ कि.मी. लांब एक गावात पाषाणाच्या रूपात असलेल्या दगडाला समर्थांनी मारुतीचे रूप दिले. ५ फुटीची मूर्ती चाफळच्या राम मंदिराकडे तोंड करून उभारलेली आहे. आधीच्या कौलारू, माती विटाच्या देऊळाला जीर्णोद्धार करून नवे रूप देण्यात आले आहे.

**३) शिंगणवाडीचा मारुती / खडीचा मारुती / बालमारुती**

याला चाफळचा तिसरा मारुती देखील म्हणतात. शिंगणवाडीची टेकडी चाफळ पासून १ की.मी. च्या अंतरावर आहे. येथे रामघळ समर्थांच्या ध्यानाचे छोटेशे स्थळ आहे. येथे समर्थांनी मारुतीची छोटीशी सुबक मूर्तीची स्थापना केली. ४ फुटी उंचीची उत्तरेकडे तोंड केलेली ही मूर्ती जिच्या डाव्या हातात ध्वजासारखी वस्तू दिसण्यात येते. सर्व ११ मारुतीच्या देऊळात हे सर्वात लहान देऊळ आहे. आजूबाजूच्या परिसरात घनदाट झाडे आहे. या देऊळाचा कळस तांबड्या रंगाने रंगविला आहे.

**४) उंब्रजचा मारुती / मठातील मारुती**

चाफळचे २ आणि माजगावातील मारुतीचे दर्शन करून परत उंब्रजला आल्यावर इथे जवळच ३ मारुती आहे. त्यातील हा एक उंब्रजचा मठातील मारुती. असंही आख्यायिका आहे की समर्थ चाफळवरून उंब्रजला दररोज स्नानेसाठी येत असत. तेव्हा एकदा ते नदीत बुडताना त्यांना स्वयं हनुमंतानेच वाचविले होते. समर्थांना उंब्रज मधील काही जमीन बक्षीस म्हणून मिळाली होती. तिथे समर्थांनी मारुतीच्या देऊळची स्थापना करून चुना, वाळू आणि तागने निर्मित ही मारुतीची देखणी मूर्ती आहे. ह्या मूर्तीच्या पायाखाली दैत्य दिसतो.

**५) मसूरचा मारुती**

उंब्रजपासून १० की.मी. असलेले मसूर येथे मारुतीची स्थापना केली आहे. ५ फुटीची चुन्यापासून बनवलेलीही पूर्वाभिमुखी असलेली मारुतीची मूर्ती अतिशय सौम्य प्रसन्न असलेली मूर्तीच्या मस्तकी मुकुट, गळ्यात माळ, जानवं, कमरेला मेखला, पायाखाली जंबुमाळी नावाचा राक्षस दिसतो. सहा दगडी खांब्यावर देऊळाचे छत तोलून धरले आहे. मूर्तीच्या एका बाजूस शिवराम आणि दुसऱ्या बाजूस समर्थांचे चित्र काढलेले आहे. या देऊळाचा सभामंडप १३ फूट लांबी रुंदीचा आहे.

**६) शिराळ्याचा मारुती**

सांगली जिल्ह्यात नागांसाठी प्रसिद्ध असलेले हे गाव शिराळे याचा एसटी स्टॅन्डजवळ हे मारुतीचे देऊळ समर्थांनी स्थापित केले आहे. हे देऊळ देखणे असून मारुतीची मूर्ती अतिशय भव्य आहे. ७ फुटी उंच ही मूर्ती चुन्याने बनवलेली आहे. ही मूर्ती उत्तराभिमुखी आहे. कटिवस्त्र आणि त्यातील गोंडा सुंदर असून कंबरपट्ट्यामध्ये घंटा बसविण्यात आला आहे. मूर्तीच्या डोक्याचा उजवी आणि डाव्या बाजूस झरोके आहे ज्यामधून सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी मूर्तीच्या तोंडावर प्रकाश पडतो. देऊळाच्या प्राकाराला दक्षिण दिशेस दार आहे.

**७) शहापूरच्या मारुती**

कराड मसूर रस्त्यावर १५ की.मी. च्या अंतरावर मसूरपासून ३ की.मी. अंतरापासून शहापूरच्या फाट्याहून १ की.मी. लांब हे मारुतीचे देऊळ आहे. ११ मारुती मधल्या मारुतीमध्ये सर्वात पहिले या मारुतीची स्थापना केली आहे. या मारुतीला चुन्याचा मारुती देखील म्हटले जाते. या गावाच्या एका टोकांवर नदीच्या काठाला मारुतीचे देऊळ आहे. देऊळ आणि मारुतीची मूर्ती दोन्ही पूर्वाभिमुखी आहे. ७ फुटाची ही मूर्ती काहीशी उग्र दिसते. या मूर्तीच्या पुढील पितळी उत्सव मूर्ती आहे. मारुतीच्या मूर्तीच्या मस्तकी गोंड्यांची टोपी आहे. येथून जवळच रांजण खिंड आहे. येथून २ दगडी रांजण दिसतात ह्याचा जवळच्या टेकडीवर समर्थांचे वास्तव्य असतं.

**८) बहे बोरगावचा मारुती**

सांगली जिल्ह्यातील वाळवे तालुक्यात बहे गावा जवळ बोरगांवामुळे त्याला बेह बोरगाव म्हटले जाते. इथल्या मारुतीच्या स्थापनेच्या मागे एक आख्यायिका आहे. ती रामायणाशी संलग्न आहे. रावणाचा वध करून श्रीराम अयोध्येला परतांना इथे बोरगावास वास्तव्यास होते. कृष्णानदीला त्यावेळी वाळवंट होते. श्रीराम संध्यास्नान करत असताना कृष्णेला पूर येतं तेव्हा मारुतीने आपले दोन्ही बाहू अडवून नदीच्या प्रवाहाला धरून ठेवले. ते प्रवाह दोन्ही बाजूस विभक्त झाले. त्यामधून एक बेट तयार झाले. आणि या क्षेत्राला बहे असे नाव मिळाले.

या जागी मारुतीचे समर्थांना मूर्तिरूपात दर्शन झाले नाही तेव्हा त्यांनी डोहात उडी मारून मारुतीची मूर्ती त्या डोहातून काढून स्थापित केली. मारुतीचे दोन्ही हात पाणी अडविण्याचा पावित्र्यात दिसून येतात डोक्यावर मुकुट हात दोन्ही मांड्यांचा बाजूला धरलेले. अशी ही भव्य मूर्ती दिसते. इथे जाण्यासाठी कृष्णानदीच्या वरील पुलाच्या पश्चिमेकडील बंधाऱ्यावरून बेटावरून जावे लागते. नदीस पूर आल्यास इथे जाणे शक्य नसते.

**९) मनपाडळेचा मारुती**

मनपाडळे आणि पारगाव कोल्हापूर जिल्ह्यात पन्हाळगड –ज्योतिबाच्या परिसरात आहे. कोल्हापूर ते वडगाव वाठारपासून पुढे १४ की.मी.च्या अंतरावर हे मनपाडळे आहे. ११ मारुती पैकी सर्वात दक्षिणे दिशेस असलेल्या या मारुती देऊळाची स्थापना समर्थांनी केली ५ फूट उंच असलेली ही साधी सुबक मूर्ती आणि देऊळ उत्तराभिमुखी आहे. मूर्ती जवळ दीडफुटी उंच कुबडी ठेवलेली आहे. जवळपास ओढ्या काठी सुंदरसे कौलारू देऊळ आहे. औरसचौरस असलेल्या गाभाऱ्याचे ह्या देऊळात नवीन बांधकाम केलेले सभामंडप देखील आहे.

**१०) पाडळी मारुती**

वारणेच्या खोऱ्यात असलेल्या मनपाडळे गावाच्या जवळच पाडळी गावात मारुतीची मूर्ती आहे.

**११) पारगावाचा मारुती**

यालाच बाळमारुती किंवा समर्थांच्या झोळीतला मारुती असे म्हणतात. कराड– कोल्हापूर रस्त्यावर वाठार गाव जवळ नव्या पारगावाजवळ जुने पारगाव आहे त्यात ही मारुतीची मूर्ती आहे. ११ मारुतींपैकी शेवटची आणि सर्वात लहान अशी ही मूर्ती सपाट दगडवर कोरलेली दीड फुटीची मूर्ती आहे. शेंदूर नसून केसांची शेंडी बांधलेली दिसते. मारुतीराया जणू डावीकडे धावत निघाल्याचा आविर्भावात ही कोरलेली आहे. मनपाडळे ते पारगाव अंतर ५ की.मी.चे असून वळसा घेलेला रस्ता आहे. या ११ मारुती शिवाय समर्थांनी गोदावरी काठी, टाकळी येथे गोमयाचा मारुतीची स्थापना केली आहे. एकदा तरी आपण ११ मारुतीचे दर्शन करावे. असे आवर्जून सांगावे वाटते.

या अकरा मारुती मंदिराची वैशिष्ट्य आहेत. समर्थांच्या समोर काही गोष्टी होत्या त्या अनुषंगाने १७ व्या शतकात या अकरा मारुतीची स्थापना केली ( १६४५ ते १६९१ ) महाराष्ट्रातील तरुणांमध्ये तंदुरुस्ती जाणीव करणे, मारुतीच्या उपासनेतून सुदृढ शरीर स्थिर मन आणि याची माहिती लोकांपर्यंत पोहोचविली तसेच हनुमंताच्या कृपेने बलोपासनेतून कणखर माणसे घडावेत यासाठी समर्थांनी ठिकठिकाणी मारुती मंदिराची स्थापना केली.

**संकटमोचन हनुमंताला आपण मानवजातीच्या कल्याणासाठी प्रार्थना करु....**

## गुणवान हनुमान..

मारुती मल्लयुध्दात
गदा युध्दात निष्णात
वायु पुत्र वायु वेगाने
सर्व दूर जाई क्षणात

सूर ताल सर्वज्ञ असे
प्राविण्य ते संगीतात
अंगीकृत अनेक गुण
उल्लेख पद्मपुराणात

प्रभू भक्ती हवी कशी
ठासली कणाकणात
फोडून दाखवी छाती
सिताराम वसे मनात

बलोपासना शुध्द तनू
ध्यान शरीर सौष्ठवात
गर्व नाही अणू भरही
जरी बलवान सर्वात

हनुमंत खरे बुध्दीवंत
वर्णन ते सुंदर कांडात
लंका दहनी तांडव ते
डंका वाजे त्रि खंडात

उत्कृष्ट बातमीदार तो
असे गुप्तहेर साक्षात
लंका माहीत इत्यंभूत
कणकण असे लक्षात

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# अहिल्यानगरमध्ये जलजीवन मिशन योजनेत कोट्यावधींचा भ्रष्टाचार


**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, अहिल्यानगर :** जिल्ह्यात जलजीवन मिशन योजनेअंतर्गत प्रत्येक व्यक्तीला दररोज ५५ लिटर शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पाइपलाइनचे जाळे विणण्यात आले आहे. या योजनेनुसार पाइपलाइन खोदताना किमान एक मीटर खोलीची अपेक्षा आहे. मात्र, केंद्र सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाच्या पथकाने तीन दिवस जिल्ह्यात मुक्काम करून केलेल्या तपासणीत अनेक ठिकाणी पाइप केवळ एक फूट खोलीवर आढळले.

या त्रुटींमुळे जलजीवन मिशन योजनेतील गैरव्यवहार आणि निकृष्ट कामाची पोलखोल झाली आहे.

**खासदार निलेश लंके यांनी उठवला आवाज !**

खासदार नीलेश लंके यांनी यापूर्वी संसदेत जलजीवन मिशनच्या कामांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. या योजनेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत त्यांनी अनेक तक्रारी असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणले होते. त्यांच्या या पाठपुराव्यामुळे ७ ते १० एप्रिल या कालावधीत जलशक्ती मंत्रालयाचे एक पथक जिल्ह्यात तपासणीसाठी दाखल झाले. या पथकाने जिल्हा परिषदेमार्फत राबवण्यात येणाऱ्या ११ योजनांची सखोल पाहणी केली.



**केंद्रीय कमिटीच्या तपासणीत कामाचे पितळ उघडे**

**कामात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास !**

पथकात नॅशनल जलजीवन मिशनचे संचालक प्रदीप सिंग आणि आनंदकुमार पांडे यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी सामील होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रकाश पोटे हे या तपासणीत प्रतिनिधी म्हणून सहभागी होते. पोटे यांनी दिलेल्या माहितीनुसार कर्जत तालुक्यातील म्हाळुंगी आणि डोंबाळवाडी येथे पाइप केवळ एक फूट खोलीवर गाडलेले आढळले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## डोंबिवलीत रिक्षाचालकांचा वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांच्या विरोधात संतापाचा उद्रेक



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.११, डोंबिवली (ठाणे) :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे कल्याण जिल्हा प्रमुख माजी नगरसेवक दिपेश पुंडलिक म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली डोंबिवली पश्चिमेत होणाऱ्या वाहतूक विभागाच्या गलथान कारभारा विरोधात शुक्रवार, दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी पं.दीनदयाळ उपाध्याय चौकात डोंबिवलीतील अंकुश म्हात्रे, उदय शेट्टी, प्रकाश तेलगोटे, शाम चौगले, सुरज पवार, नितीन पवार, प्रमोद कांबळे, संजय पाटील आणि सर्व रिक्षा चालक मालक पदाधिकारी

युनियनच्या वतीने भव्य रिक्षा बंद आंदोलन व जोरदार निदर्शने करण्यात आली. डोंबिवलीतील रस्त्यांवरील वाहतूक गोंधळाला प्रशासनाची डोळेझाक या सगळ्याचा निषेध करत रिक्षा युनियनने ठाम पवित्रा घेतला आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतूक विभाग कल्याण संजय साबळे आणि डोंबिवली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील यांनी मागण्या मान्य करून त्वरित योग्य ती कारवाई केली जाईल असे आश्वासन दिल्याने आंदोलन महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्प अर्पण करून स्थगित करण्यात आले. पण, जर आश्वासनाला कृतीची जोड नसेल, तर पुढील आंदोलन आणखी तीव्र असेल असे इशारा देण्यात आले. शिवसेना, युवासेना आणि महिला आघाडीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या आंदोलनात ठाम सहभाग नोंदवत एकजूट दाखवली.

## घराजवळील कबुतरांचा जास्त वावर ठरू शकतो जीवघेणा



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.११, डोंबिवली (ठाणे) :** शहरात कबुतरांची संख्या झपाट्याने वाढत आहे आणि त्यांच्या विष्ठा व पिसांमुळे मानवी आरोग्य धोक्यात येत असल्याचे निरीक्षण डॉक्टरांनी नोंदवले आहे. कबुतरांना दाणा-पाणी देताना 'हायपर सेन्सेटिव्हिटी न्यूमोनायटिस' (क्ष) हा फुफ्फुसाचा गंभीर आजार होण्याची शक्यता असल्याचा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. लीलावती रुग्णालय व डोंबिवलीतील ओजस हॉस्पिटलच्या चेस्ट फिजिशियन डॉ.दीप्ती बडवे-कुलकर्णी यांच्याशी डोंबिवली पत्रकार संघाने आयोजित केलेल्या परिसंवादात या आजाराबाबत माहिती देण्यात आली.

डॉ.बडवे यांनी सांगितले की, कबुतरांची विष्ठा आणि गळालेली पिसे यामधून हवेत सूक्ष्म कण मिसळतात. हे कण श्वासावाटे शरीरात प्रवेश करतात आणि फुफ्फुसांवर परिणाम करून 'हायपर सेन्सेटिव्हिटी न्यूमोनायटिस' या आजारास कारणीभूत ठरतात.या आजारात सुरुवातीला खोकला, ताप, दम लागणे अशी लक्षणे दिसतात. याकडे दुर्लक्ष केल्यास दीर्घकालीन फुफ्फुसाचे आजार, श्वसनमार्गाचे विकार निर्माण होऊ शकतात.

**घ्याव्यात या काळजीच्या उपाययोजना -** कबुतरांना दाणा-पाणी देणे टाळावे, घराच्या बाल्कनी व खिडक्यांना जाळी बसवावी, टोलेजंग इमारतींमध्ये कबुतरांचा वावर रोखावा, श्वसनास त्रास जाणवल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

हा परिसंवाद डोंबिवली पूर्वेकडील टिळकनगर पोस्ट ऑफिसजवळील ओजस हॉस्पिटलमध्ये आयोजित करण्यात आला होता. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष शंकर जाधव, सचिव प्रशांत जोशी आणि सदस्य सोनल सावंत-पवार उपस्थित होते.

## विंचूर विद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा फुलेंना अभिवादन



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.११, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी विद्यालयातील इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी विद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी थोर समाज सुधारक, स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विषयी भाषणातून आपले विचार मांडले.

आदिती जेऊघाले, वेदिका फड, आदित्य घायाळ, कल्याणी जाधव, राणी दरेकर, सोहम सोनवणे, श्रुतिका दरेकर, श्रद्धा जेऊघाले, मानसी दरेकर, ज्ञानेश्वरी होन, श्रुती साबळे आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे उपमुख्याध्यापक सुरेश वाबळे होते. थोर महात्म्यांचे असे कार्यक्रम साजरे करत असताना अशा महात्म्यांचा आदर्श आपण घेतला पाहिजे व जीवनात यशस्वी होण्यासाठी नेहमीच एक आदर्श आपल्या डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. असे यावेळी बोलताना ते म्हणाले. सदर कार्यक्रम प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक नंदकुमार देवढे, पर्यवेक्षक सुदामराव माळी, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व विद्यालयातील उपशिक्षक राजेंद्र चांदे, ज्युनियर विभागाचे एचओडी राजेंद्र टिळेकर तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

## क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांना जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी यांचे अभिवादन



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.११, ठाणे :** क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांना जयंती निमित्त जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी आज येथे विनम्र अभिवादन केले. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी शिनगारे यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

याप्रसंगी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने या मान्यवरांसह इतर उपस्थित अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही महात्मा फुले यांना अभिवादन केले.

## वक्फ विरोधी विधेयक त्वरीत मागे घ्या; मुस्लिम समाजाचे प्रधानमंत्र्याना निवेदन




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, धाराशिव :** वक्फ सुधारणा विधेयक २०२५ त्वरित मागे घेण्याच्या मागणीसाठी धाराशिव येथील मुस्लिम बांधवाच्या वतीने निवेदन देण्यात आले. जिल्हाधिकार्यांमार्फत पाठविण्यात आलेल्या निवेदनात म्हटले की, केंद्र सरकारची ही कृती भारत देशात राहणार्या जवळ-जवळ ३० ते ३५ कोटी मुस्लीम समाजाच्या हिताच्या विरोधात असुन आम्ही त्याचा तीव्र निषेध करीत आहोत.

सदरील विधेयक व त्यातील तरतुदी हया संविधानाच्या कलम १४, १५ (समानता), २५ (धार्मिक स्वातंत्र), २६ (धार्मिक बाबींचे नियमन) आणि २९ (अल्पसख्यांक हक्क) अंतर्गत मुलभुत अधिकारांचे उल्लंघन करीत असुन देशात राहणार्या नागरीकांच्या धर्म स्वतंत्र या मुलभुत अधिकारावरच गदा आणत आहेत. तसेच वक्फ कायद्यातील बदल कलम (३००अ) मालमत्तेच्या अधिकाराच्या विरोधात आहे. देशात जवळ-जवळ ९ लक्ष एकर जमीन व इतर स्थावर व जंगम मालमत्ता ही मुस्लीम धर्मातील लोकांनी आपली खाजगी जमीन व संपत्ती वक्फ करुन समाज हितासाठी दान केली आहे. ही संपत्ती कुठल्याही सरकारच्या मालकीची नाही.

सदरील जमीन व मालमत्तेचे व्यवस्थापन, होणारे तंटे व त्याचे निवारण याबाबत अनेक वर्षापासुन अथक प्रयत्न करुन सन १९९५ मध्ये एक परिपुर्ण व मजबुत असा वक्फ कायदा संसदेने पास केला होता. त्याला देशातील सर्व मुस्लीम समाजाची अनुमती होती व हा कायदा देशात लागु होवुन त्यातुन व्यवस्थित कार्य पार पाडले जात असताना सरकारने अल्पसंख्यांक मुस्लीम समाजाच्या बाबतीत द्वेष भावनेतुन वक्फचे ९ लक्ष एकर जमीनीवर डोळा ठेवुन ती जमीन मोठमोठे उद्योगपती, संस्था, गैरमुस्लीम खाजगी व्यक्ती यांना देण्याच्या उद्देशाने हा कायदा पारीत केला आहे असे आम्हाला वाटते त्यासाठी सदरील जमीनीचे सुलभ हस्तांतरण व्हावे.

यासाठी जिल्हयातील जिल्हाधिकारी यांना वक्फ संपती बाबत सर्वस्वी निर्णयाचे अधिकार देणे, वक्फ बोर्डावर दोन गैरमुस्लीम सदस्यांची नियुक्ती करणे, वक्फ बोर्ड व त्यांची न्यायाधिकरण यांचे अधिकार कमी करणे, वक्फ संपती दान करण्यासाठी अत्यंत चुकीची पात्रता लावणे, प्रचलीत वक्फ संपती शोधण्यासाठी सर्वे चा अधिकार रद्द करणे अशा अनेक घातक तरतुदी या विधेयकात असुन ते आम्ही कदापीही मान्य करणार नाही. मुस्लीम समाजाच्या सहनशिलतेचा अंत न पाहता संपुर्ण भारतीयांच्या जनभावना लक्षात घेवुन सदर विधेयक आपण व भारत सरकारने विनाविलंब माघारी घ्यावे जेणेकरुन भारतातील सामाजिक सौम्य, शांतता अबाधीत राहुन देश प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी मसूद शेख, मौलाना जाफर खान, मुफ्ती कादिर, खलील सय्यद, खादर पठाण, मैनुद्दीन पठाण, आयाज शेख, इस्माईल शेख, खलिफा कुरेशी, अफरोज पिरजादे, इलियाज पिरजादे, बाबा मुजावर, आतीख शेख, वाजिद पठाण, मुफ्ती साहब, मौलाना इमाम खान, मौलाना अहमद, मौलाना शौकत, बिलाल तांबोळी ड अलीम शेख, एजाज काझी, मुस्तफा खान, अकबर पठाण, नादेरउल्ला हुसेनी, सिकंदर पटेल, जमीर शेख, मुफ्ती निजाम,अन्वर शेख, सरफराज काझी, खारी मक्सुद, सजीयोद्दीन शेख,मौलाना आयुब सय्यद, इस्माईल खारी व इतर बांधव उपस्थित होते.

## दुचाकी स्वरांनी महिला वॉर्डनला दिली धडक



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.११, डोंबिवली (ठाणे) :** डोबिवली वाहतुक शाखा येथील महिला प्रायवूहेट वॉर्डन निशा जाधव या दत्त चौक येथे वाहतुक नियमन करीत असताना तेथे एक दुचाकी स्वाराने त्यांना मागुन येऊन जोरात धडक दिल्याने त्या खाली पडल्या. तरी ही दुचाकी चालकाने त्यांच्या पायावर दुचाकी चालवली. यामुळे निशा जाधव यांनी चालकास निट गाडी चालवता येत नाही का असे विचारत त्यास पकडण्यास गेले असता त्या चालकाने निशा जाधव यांच्या हात पकडत जोरात पिरगळत व त्यांना मारहाण केली. त्या ठिकाणी वाहतुक कर्मचारी यांनी येऊन त्या दुचाकी चालकास दुचाकी सह वाहतूक शाखेत कारवाहीसाठी आणले. या घटनेत निशा जाधव यांच्या उजव्या पाया व हाताला दुखापत झाली असल्यामुळे त्यांना तात्काळ शासकीय रुग्णालय शास्त्रीनगर डोबिवली येथे उपचार करण्याण्यास आणले. तेथे त्या बरोबर असलेल्या महिला मदतनीस कानेरकर व वॉर्डन साळवे यांनी वाहतुक शाखातील दिनकर सोमासे यांना या बद्दल फोनव्दारे कळविले असता तेथे सोमासे यांनी निशा जाधव यांना उपचारा करण्यासाठी मदत केली. निशा जाधव यांना डाव्या पायाला दुखापत झाली असल्याने डॉक्टरांनी उपचार सुरू केले. या घटनेमुळे दुचाकी चालकावर गुन्हा दाखल करण्याचे काम रामनगर पोलिस ठाण्यात सुरू असल्याची माहिती दिली.

## टाकळी ढोकेश्वरमध्ये महात्मा फुले यांचा पुतळा उभारणार

### महात्मा फुले यांचे समतेचे विचार समाजाला दिशादर्शक - बाळासाहेब खिलारी




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी शेतकरी शोषित आणि वंचित यांच्या प्रश्नांना सर्वप्रथम वाचा फोडली. त्यांनी बहुजनांच्या विकासाचा, समतेचा आणि पुरोगामी विचार जगाला दिला.

सर्वधर्मसमभाव, बंधुता आणि समता जपणारा त्यांचा मानवतावादी विचारच देशाला पुढे नेणारा आहे, असे प्रतिपादन खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांनी केले. तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथे महात्मा फुले समता परिषद आणि श्री संत सावतामाळी प्रतिष्ठानच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

महात्मा फुले चौकात महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी पाटील, दत्त देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त गंगाधर बांडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष अंकुश पायमोडे, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष पत्रकार वसंत रांधवण, विलास नाईकवाडी, संतोष झावरे, राजू शिंदे, विष्णू धुमाळ, ओम रांधवण, आदित्य रांधवण, सुशांत लोंढे, ग्रामविकास अधिकारी भास्कर लोंढे, कैलास लोंढे, संपत झावरे, बाबू गुंजाळ, तुषार लोंढे, सार्थक लोंढे आदिंसह ग्रामस्थ उपस्थित होते. बाबासाहेब खिलारी म्हणाले की, जाती - धर्मात द्वेष पसरत असताना महात्मा फुले यांचे समतेचे विचार समाजाला दिशादर्शक आहे.

महात्मा फुले यांनी समतेचे राज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांची समाधी शोधून काढली आणि शिवाजी महाराजांची पहिली जयंती साजरी केली.

> महात्मा फुले यांनी त्याकाळात परिस्थितीशी संघर्ष करून समाजसुधारणेचे कार्य केले. शेतकरी, महिला व बहुजन समाजाला सन्मान मिळण्यासाठी त्यांनी शिक्षणाची संधी उपलब्ध करून क्रांती घडवली. छत्रपती शिवाजी महाराजांना गुरुस्थानी मानून त्यांनी आधुनिक व क्रांतिकारी विचारांनी पुरोगामी महाराष्ट्राची खऱ्या अर्थाने पायभरणी केली आहे.
>
> **- अंकुश पायमोडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे पारनेर तालुका उपाध्यक्ष**

समाजात समता आणि रुढी, परंपरा दूर होण्यासाठी त्यांनी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून समाजात क्रांती घडवली त्यांचा विचारांचा वारसा नेहमी जपला जाईल आता खासदार निलेशजी लंके यांच्या नेतृत्वाखाली टाकळी ढोकेश्वर मध्ये क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुतळा उभारणार असल्याची घोषणा बाळासाहेब खिलारी यांनी केली आहे.

## भाजपा तर्फे आयोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकर सन्मान अभियानात सहभागी होण्याचे आवाहन

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.११, मुदखेड (नांदेड) :** भारतीय जनता पार्टी महाराष्ट्राच्या वतीने दिनांक १३ एप्रिल ते २५ एप्रिल २०२५ पर्यंत संपूर्ण राज्यांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या अनुषंगाने महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर सन्मान अभियान प्रत्येक बुथवर राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे अभियान यशस्वीरित्या राबविण्यासाठी प्रदेश स्तरावर एक समिती गठीत करण्यात आली असून या समितीचे प्रदेश संयोजक म्हणून ॲड.भरत पाटील, प्रदेश सहसंयोजक म्हणून शशिकांत कांबळे, मुंबई विभागाचे संयोजक म्हणून विजय भाई गिरकर, ठाणे कोकण विभागाचे संयोजक म्हणून प्रा.आरती पुगावकर पश्चिम, महाराष्ट्राचे संयोजक म्हणून आ.अमित गोरखे, विदर्भ विभागाचे संयोजक म्हणून अँड धर्मपाल मेश्राम, मराठवाडा विभागाचे संयोजक म्हणून पंडित सूर्यवंशी, उत्तर महाराष्ट्राचे संयोजक म्हणून सचिन आरडे यांची निवड करण्यात आली आहे. या समितीमार्फत संपूर्ण राज्यातील बुथ, मंडळ व जिल्हानिहाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सन्मान अभियानाचे संचलन केले जाणार आहे. अशाच प्रकारची त्रिस्तरीय समिती प्रत्येक जिल्ह्याला नेमण्यात आली आहे. भाजपा नांदेड उत्तर जिल्ह्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सन्मान अभियान संचलन समितीचे प्रमुख संयोजक जिल्हा महामंत्री प्रवीण गायकवाड, अनुसूचित जाती मोर्च्याचे जिल्हाध्यक्ष विलास साबळे, हदगाव विधानसभा संयोजक म्हणून व्यंकटेश लोणे, किनवट विधानसभा संयोजक म्हणून प्रदीप एडके यांच्या नेमणुका भाजपा नांदेड उत्तर जिल्ह्याचे अध्यक्ष अँड किशोर देशमुख यांनी केल्या आहेत. या समितीमार्फत जिल्ह्यातील मंडळ व बुथ निहाय कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येणार आहे. भाजपाचे सर्व पदाधिकारी दि.१३ एप्रिल २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा, विहार, प्रतिमा सजावट व परिसर स्वच्छता करून जयंतीच्या पूर्वसंध्येला बुथ व मंडळ निहाय दीपोत्सव कार्यक्रम करणार आहेत. याचप्रमाणे राज्यभर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जन्मस्थान शिक्षण वास्तव्य व जीवन प्रवास या ठिकाणी प्रदेशाच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१४ एप्रिल २०२५ रोजी शहरातील मिरवणुकीत सहभागी होऊन शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी विनम्र अभिवादनाचे बॅनर होल्डिंग लावण्यात येणार असून, मिरवणुकीच्या ठिकाणावर शरबत वाटप करण्यात येणार आहे. भाजपा वैद्यकीय आघाडीच्या वतीने दलित वस्त्यांमध्ये आरोग्य शिबिर आयोजन करण्यात येणार आहेत, प्रत्येक बूथ वर वस्तीतील अंगणवाड्यात भेटवस्तू व खाऊचे वाटप करण्यात येणार आहे. प्रत्येक बुथवर प्रतिमापूजन व संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात येणार आहे. दिनांक १५ एप्रिल ते २५ एप्रिल दरम्यान संघटनात्मक प्रत्येक जिल्ह्यात समाजातील प्रबुद्ध,प्रतिष्ठित प्रभावी व्यक्तींचे संमेलन आयोजित करण्यात येणार आहे. या संमेलनासाठी भाजपच्या प्रदेश कार्यालयातून प्रत्येक जिल्ह्याला एक वक्ता कळविण्यात येणार आहे. तेव्हा या संपूर्ण कार्यक्रमात भाजपाच्या आमदार खासदार मंत्री बुथ मंडळ व जिल्हा पदाधिकाऱ्यांनी सर्व कार्यक्रमात सहभाग नोंदवावा असे आवाहन भाजपा नांदेड उत्तर जिल्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर सन्मान अभियानाचे संयोजक तथा जिल्हा महामंत्री प्रवीण गायकवाड यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

अक्षराज


# जारच्या जमान्यात पाणपोई झाल्या कालबाह्य

## कुंडलवाडी शहरातील चौका-चौकात, बसस्थानकात, रहदारीच्या रस्त्यावर, आठवडी बाजारात पूर्वी असायच्या पाणपोई

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.११, कुंडलवाडी (नांदेड) :** पूर्वी उन्हाळा आला की, तहानलेल्यांची तहान भागविण्यासाठी सामाजिक कार्याची जाण ठेवत सामाजिक संस्था व दानशूर व्यक्ती स्वखर्चाने पाणपोई सुरू करत. परंतु अलीकडच्या काळामध्ये पाण्याचा व्यापार सुरू झाल्याने आणि पाणपोईंचा धर्म, जार व बाटली बंद झाला. म्हणून जार व बाटली बंद जमान्यात पाणपोई गायब होत चालल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. त्यामुळे पाणी भरून रांजण मांडलेल्या पाणपोई कालबाहय झाल्या आहेत. तहानलेल्यांना पाणी पाजणे ही आपली संस्कृती आहे.




त्यामुळे पूर्वीच्या काळी सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या संस्था, संघटना सामाजिक सेवेची जान ठेवत वाटसरूंना प्यायचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी बसस्थानक, शासकीय कार्यालय, रहदारीच्या रस्त्यावर, आठवडी बाजारात आदी ठिकाणी पाणपोई उभारत होते. त्यामुळे रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्यांची, गरीब कष्टकरी यांच्यासाठी पाणपोईने चांगली सोय होत होती.

विशेषतः उन्हाळ्यात यावर भर दिला जात असे.कारण तेंव्हा जारचे प्लांट, बाटली बंद पाण्याचा व्यापार फारसा विस्तारीत झाला नव्हता. अलीकडे मात्र जारच्या माध्यमातून पाणी विकत व सवलतीच्या दरात मिळू लागल्याने पाणपोईंची पद्धत मागे पडू लागली तर, पाणपोईचे पाणी मिळणे, किंवा पिणे काही आता कमीपणा वाटू लागला आहे. एवढेच काय तर हॉटेलमध्ये बाटलीबंद पाणी विकत घेऊन पिणाऱ्यांची संख्या जास्त वाढली आहे. परंतु ज्यांना बाटलीबंद पाणी विकत घेणे शक्य नाही, प्रवासात जार घेणे शक्य नाही. अशा गोरगरिब, सामान्यांचे उन्हाळ्यात हाल होत आहेत. त्यामुळे विविध मंडळे दानशूर व्यक्ती, सामाजिक संघटना यांनी पुढाकार घेऊन पाणपोई पुन्हा सुरू करून तहानलेल्यांना पाणी उपलब्ध करून देण्याची गरज आहे

ढ्घरातील स्टूलवरच्या माठाची जागा घेतली जार ने पूर्वीच्या काळी घराबाहेर पडल्यानंतर झाडाखाली सावलीच्या ठिकाणी कुठे रांजण, माठ, त्यावर लाकडी झाकणी आणि लाल रंगाचा ओला कपडा झाकलेले पाणी पिण्यासाठी रंगीबेरंगी प्लास्टिकचे ग्लास अशी पाणपोई असायची, त्या रांजणांमधील नैसर्गिक पद्धतीने थंड झालेले पाणी पिले की तहान भागायची. परंतु कालांतराने संकल्प बदलले, पाणपोईची जागा, थंड पाण्याच्या जारने घेतली. जारमुळे मातीच्या माठांचा, राजंणचा वापर कमी झाला. परिणामी पाण्याने रांजण भरलेल्या पाणपोई कालबाहय झाल्याचे सर्वत्र दिसून येत आहे.

# समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या तत्वांमुळे विरोधकांना संविधान बदलताच येत नाही

## संविधान अभ्यासक ॲड. धनराज यांचे प्रतिपादन

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१०, धाराशिव :** संविधानाला न मानणारी मंडळीच संविधान बदलण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहेत. परंतु सर्व वंचित समूहाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संविधानामध्ये सम ता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या तत्त्वांचा समावेश करून सर्वांचे हक्क व सुरक्षितता भरभक्कम करुन ठेवलेली आहे. त्यातच जनतेचा संविधानावर प्रचंड विश्वास असल्यामुळे संविधान त्या मंडळींना बदलता येत नसल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयातील संविधान अभ्यासक ॲड.जयमंगल धनराज यांनी केले.

दिनांक १० एप्रिल २०२५ रोजी धाराशिव शहरातील सोनाई फंक्शन हॉलम ध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार मंचच्यावतीने आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. 'भारतीय संविधानाची ७५ वर्षे वाटचाल, सद्यस्थिती आणि भवितव्य' या विषयावर त्यांनी व्याख्यान दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. मनोहर सिरसाट हे उपस्थित होते.

पुढे बोलताना ॲड.धनराज म्हणाले की, डॉ.आंबेडकरांनी तयार केलेल्या भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. या संविधानामध्ये नागरिकांचे मुलभूत अधिकार, हक्क, कर्तव्य व जबाबदार्या यांचे कवचकुंडले घटनेच्या भाग ३ व ४ मध्ये समाविष्ट केली असल्याची त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे सर्व प्रकारची स्वातंत्र्य दिलेली असल्यामुळे ते थेट जनतेच्या निगडित असून हे अधिकारांचे गिफ्ट देणारे संविधान असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच संविधानावर जेंव्हा संकट येतात. तेव्हा तेंव्हा ती संकटे जनताच उधळून लावते, असे सांगत ते म्हणाले की, संविधानाची जागृती होणे अत्यंत गरजेचे आहे. सरकारला जनतेच्या हितासाठी कायदे करावे लागतात. त्याचे निर्दे श घटनेच्या चौथ्या भागात दिले असून सरकारने मुलभूत अधिकारांचे उल्लंघन केल्यास त्या विरोधात न्यायालयात दाद मागता येत असल्याचे त्यांनी सांगितले. देशातील ८० कोटी जनतेला फुकटचे अन्न देऊन त्यांची घरे चालविली जातात. शेतकरी त्याच्या मालाला भाव मिळावा म्हणून टाहो फोडत आहे. मात्र भाव दिला जात नाही. तर बेरोजगारी हे राजकीय मुद्दे नसून ते जनतेचे आहेत. त्यांच्या हाताला काम दिले जात नाही किंवा रोजगाराचे कौशल्य दिसत नाही. त्याम ुळेच बांगला देशापेक्षा भारत मागासलेला देश असल्याचे त्यांनी नमूद केले. येथील जनतेत समतेचा झरा वाहत असून संविधानाप्रमाणे हा देश चालावा, असे जनतेला वाटत असल्यामुळे संविधानाची शंभरावी आपण साजरी करणार असल्याचे धनराज यांनी सांगितले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.सिरसाट म्हणाले की, डॉ.आंबेडकरांनी ज्यांचे ज्यांचे शोषण झाले, त्यांचे त्यांचे पोषण करण्याची जबाबदारी संविधानाच्या म ाध्यमातून घेतली आहे. हे राष्ट्र निर्माणाचे काम आहे. तर १४ एप्रिल हा महाम ुक्तीचा दिन असून संविधानातून मुक्तीचा मार्ग दिला असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच २० वे शकत हे देश घडविण्याचे असून डॉ.आंबेडकर हे प्रमुख भूमिकेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. आंबेडकर उपेक्षित माणसांना प्रतिष्ठीत करु पाहत होते. त्यांच्यामुळेच माणसाला अस्तित्व प्राप्त झाले असल्याचे त्यांनी सांगितले. एकीकडे जगभरात हंगेरी सारखे देश डॉ.आंबेडकरांनी लिहिलेली राज्यघटना व त्यांचे तत्वज्ञान स्विकारु पाहत आहेत. तर दुसरीकडे भारतात काही मंडळी संविधानाबाबत संकुचित वृत्तीने पाहत आहेत. विशेष म्हणजे डॉ. आंबेडकर यांच्या कर्तृत्वाचे संविधान हे सर्वोच्च टोक असून संवेदनशीलतेबरोबरच संविधानशील माणसे निर्माण करावीत, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रम ाचे प्रास्ताविक प्रा.दिनकर झेंडे यांनी तर पाहुण्यांचा परिचय मारोती पवार यांनी तसेच सूत्रसंचालन बाबासाहेब मनोहर यांनी व उपस्थितांचे आभार त्रिशला ठाणांबिरे यांनी मानले. यावेळी महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उल्लेखनीय काम करणारे पोलीस उपनिरीक्षक राम घाडगे, जिल्हा विधिज्ञ मंडळाचे ॲड. वाकुरे, ॲड. भाग्यश्री रणखांब, धाराशिव जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष देवीदास पाठक, मराठा सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष धर्मवीर कदम, चर्मकार महासंघाचे नितीन शेरखाने, बबन वाघमारे, ॲड. वाघमारे, नालंदा बुद्ध विहार उपक्रमशील महिला, भारतीय बौद्ध महासभेच्या शिला चंदनशिवे, परमेश्वर नागटिळक, राहुल शिरसाठ, आकांक्षा इंगळे, प्रियंका माने, रक्षीत शिंगाडे, अजिंक्य गायकवाड, सचिन वाघमारे, सुदर्शन कांबळे, अभय देव्हारे, गौतम ढावारे यांचा सन्मान करण्यात आला.

# राज्यस्तरीय दर्जेदार व्हिडीओ निर्मिती स्पर्धेमधे वसुंधरा धोटे प्रथम क्रमांक पुरस्काराने सन्मानित

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.११, नागपूर :** शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य विद्या प्राधिकरण, पुणे यांच्यामार्फत आयोजित शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती जिल्हास्तरीय स्पर्धेत इयत्ता ६ ते ८ वा वर्ग गटात भाषा विषयाचे उत्तम व्हिडिओ निर्मितीसाठी जि.प.उ.प्रा. शा. गावसुत, ता.उमरेड जि.नागपुर जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त वसुंधरा गजानन धोटे यांनी प्रथम क्रमांक पटकावत उमरेड तालुक्याच्या शिरपेचात वारंवार मानाचा तुरा रोवत



आहेत. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था रवीनगर नागपूर यांच्याअंतर्गत शिक्षकांसाठी दर्जेदार व्हिडीओ निर्मिती स्पर्धा २०२३-२४ चा निकाल नुकताच जाहीर झाला. यात तालुका स्तरावर सतत नवनवीन उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन क्रमांक पटकाविणाऱ्या आपतूर केंद्रातील जि.प.उ.प्राथमिक शाळा गावसुत शाळेतील पदविधर विज्ञान शिक्षिका यांनी या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. सदर स्पेंधेत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नागपूर येथिल प्राचार्या डॉ.हर्षलता बुराडे तसेच डॉ.अपर्णा शंखदरवार अधिव्याख्याता यांच्या हस्ते प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व रोख १० हजार रुपये देऊन गौरविण्यात आले. यासाठी त्यांनी गावसुत शाळेतील आपली मुले (विद्यार्थी), मुख्याध्यापक अशोक तागडे व सहकारी शिक्षकांचे आभार व्यक्त केले. नितेश माने गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी छत्रपाल पटले, सुधाकर मते ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, निरंजन गायकवाड केंद्र प्रम ुखआपतूर कुही तालुक्यातुन आपल्या कार्याची मशाल घेऊन उमरेड तालुक्यात आपल्या यशाची पायरी चढण्याकरीता फेगड केंद्राच्या उषा चव्हाण केंद्रप्रमुख त्याचप्रमाणे कुहीचे अशोक बान्ते ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी यांनी त्यांचे भरभरुन अभिनंदन आणि स्वागत केले. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# मिशन आरंभ परीक्षेत धाडगेवाडी शाळेची उत्कृष्ट कामगिरी

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.११, सुपा (अहिल्यानगर) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धाडगेवाडी शाळेतील कु.योगेश्वरी ज्ञानेश्वर गाढवे या विद्यार्थिनीने इयत्ता ४ थी मिशन आरंभ शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवलेबद्दल शाळा व्यवस्थापन समिती धाडगेवाडी व पालक वर्ग यांनी तिचा सन्मान करून कौतुक केले. तसेच या परीक्षेत १) तन्वी इंद्रजीत साबळे -२३६ गुण २)आयुष प्रवीण साबळे - २२८ गुण ३) अनुष्का संतोष मांडगे - २०२ गुण मिळवून उत्कृष्ट यश संपादन केले. त्याबद्दल त्यांचा ही गौरव करण्यात आला.

शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिलीप गाढवे यांनी आपल्या भाषणातून यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व तिला मार्गदर्शन करणाऱ्या झेंडे व ठुबे यांचा ही चांगल्या कामाबद्दल सन्मान करण्यात आला. पुढील भावी शैक्षणिक वाटचालीसाठी सर्व विद्यार्थ्यांना खूप खूप शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी रांजणगावचे सरपंच इंद्रजीत साबळे, म ोहनराव मेहेत्रे, दिपकराव गाढवे, प्रविण साबळे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# थोडक्यात

## अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.१०, भिवंडी (ठाणे) :** ठाणे जिल्ह्यात पडलेल्या अवकाळी पावसामुळे भाजीपाला व फळ उत्पादक आणि वीटभट्टी व्यावसायिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अवकाळी पावसासह झालेल्या वादळात अनेकांची घरे उध्वस्त झाली आहेत. या सर्वांना पंचनामा करून तातडीने भरीव नुकसान भरपाई द्यावी. अशी मागणी ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दयानंद चोरघे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषी मंत्री माणिकराव कोकाटे व ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना निवेदन दिले आहे. दयानंद चोरघे यांनी मुख्यमंत्री कृषी मंत्री व जिल्हाधिकारी ठाणे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ठाणे जिल्ह्यात दिनांक ०४ एप्रिल रोजी मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस व वादळ वारा यामुळे भाजीपाला व फळ उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच विटांचे नुकसान होऊन वीटभट्टी व्यवसाय धोक्यात आला आहे. तर ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील शेतकऱ्यांच्या घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. महाराष्ट्र सरकार पिक कर्ज माफ करेल या आशेवर असणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफी झाली नाहीच. उलट अवकाळी पाऊस व वादळ वाऱ्याचा फटका बसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत मिळण्याची गरज असून तातडीने पंचनामे करून शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीला धावून यावे असे निवेदनात दयानंद चोरघे यांनी म्हटले आहे. शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत न केल्यास काँग्रेस पक्षातर्फे जन आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा ही काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी सरकारला दिला आहे.

## शारीरिक शिक्षण शिक्षकांचे शिर्डी येथे महाअधिवेशन

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.११, मुंबई :** महाराष्ट्र राज्य शारीरिक शिक्षण शिक्षक समन्वय समिती, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शारीरिक शिक्षण शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र शारीरिक शिक्षण व क्रीडा महासंघ, महाराष्ट्र राज्य युवा शारीरिक शिक्षण महासंघ, शारीरिक शिक्षण शिक्षक युनिट मुंबई महानगरपालिका व सर्व सहयोगी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शिर्डी येथे राज्यस्तरीय दुसरे शारीरिक शिक्षण शिक्षक महाअधिवेशन दिनांक १२ ते १४ एप्रिल २०२५ या कालावधीत सप्तपदी मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, महाराष्ट्र राज्यातील शारीरिक शिक्षण शिक्षकांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या महाधिवेशनात राज्यभरातील शारीरिक शिक्षण शिक्षकमोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या महाअधिवेशनामध्ये शारीरिक शिक्षण शिक्षकांना आधुनिक क्रीडा तंत्रज्ञान, अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती, मूल्यमापन, फिट इंडिया तसेच नवीन शैक्षणिक धोरण याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या क्रीडा अधिवेशनास महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यातून जवळपास ४ हजार क्रीडा शिक्षक उपस्थित राहणार आहेत. हे म हाधिवेशन डिजिटल युगातील फिजिकल फिटनेस व फिजिकल लिटरसी या थीमवर आधारित होणार आहे.शिक्षण आणि क्रीडा यांची सांगड घालणाऱ्या शारीरिक शिक्षण शिक्षकांसाठी ह्या प्रेरणादायी अधिवेशनाचे उद्घाटन रविवार, दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० वाजता विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तामामा भरणे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत होणार आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्य शारीरिक शिक्षण शिक्षक समन्वय समिती मुंबई प्रमुख डॉ.जितेंद्र लिंबकर यांनी दिली. या महाधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी राजेंद्र कोतकर, विश्वनाथ पाटोळे, ज्ञानेश काळे, शरद वाबळे, संजय पाटील व सर्व जिल्ह्यातील संघटन प्रमुख आणि शारीरिक शिक्षण शिक्षक मेहनत घेत आहेत.

## डॉ.व्ही.पी.एज्युकेशनल कॅम्पसमध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.११, धाराशिव :** डॉ.व्ही.पी.एज्युकेशनल कॅम्पस छत्रपती संभाजी नगर रोड,धाराशिव येथे डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.महात्मा ज्योतिबा फुले हे नाव आपल्या देशात पूजनीय आहे. कारण भारतीय समाजाच्या उन्नती आणि सामाजिक सुधारणा क्षेत्रात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. त्यांनी शिक्षण,समाज सुधारणा,म हिलांचे शिक्षण या क्षेत्रात काम केले आणि कष्टकरी वर्गातील लोकांना चांगले जीवन जगण्याचा संदेश दिला. त्यांनी दिलेले योगदान आणि त्यांचा आदर्शाचा प्रभाव आजही आपल्यामध्ये कायम आहे. यावेळी बी.एड.कॉलेजचेप्राचार्य ऋषिकेश लोमटे, कृषी महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा.हरीघाडगे, प्रा.काकासाहेबपौळ, प्रा.सुकेशनी गव्हाणे, प्रा.अंजुमशेख,प्रा. सुनील बनसोडे, प्रा.दत्तात्रय घावटे, बालाजी मुंढे,अभिरुद्र सुतार, दत्ता काकूर्णे उपस्थित होते.

## कल्याण ग्रामीण आमदार मोरे यांची उंबर्ली गावच्या पर्यटन विकासाला चालना

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.११, कल्याण (ठाणे) :** कल्याण ग्रामीण मधील उंबर्ली गावाला नैसर्गिक विविधता आणि विविध समृद्ध अशी जैवविविधता लाभली आहे. याच निसर्ग सौंदर्याचा लाभ ठाणे जिल्हा तसेच महाराष्ट्रातील तमाम निसर्ग प्रेमिना घेता यावा. यासाठी येथील नैसर्गिक टेकडीवर पर्यटक प्रेक्षनीय गॅलरी, नैसर्गिक दगडाची पायवाट यासारख्या सुविधा उपलब्ध करून उंबर्ली गावचे नाव लौकिक वाढावे स्थानिक ग्रामस्थांना पर्यटनामुळे रोजगार उपलब्ध व्हावा. या हेतूने येथे संपूर्ण विकास आराखडा लवकरात लवकर तयार करून अंमलात आणावा. यासाठीचे संबंधित निर्देश आमदार यांनी बदलापूर वनक्षेत्र अधिकारी धरवणे कल्याण परीघ वनक्षेत्र अधिकारी चेने तसेच संबंधित बांधकाम विभागाच्या उप-अभियंता संपदा मोहरीर यांना दिले. याप्रसंगी स्थानिक समाजसेवक तथा ग्रामस्थ लालचंद पाटील तसेच अनेक शिवसेना पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.